ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 10 | JUNE - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# महाकवी कालिदासांच्या साहित्यातील पर्यावरण संरक्षण




प्रा. प्रमिला एस. बोरकर
सहा. प्राध्यापक (संस्कृत) व विभाग प्रमुख ,
राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला

मनुष्यजीवन जगण्याचा संबंध म्हटला पंचतत्वाशी येतो तसाच पर्यावरणाशीही येतो. पंचतत्वातच मनुष्याचा जन्म मृत्यू सामावलेला आहे. या पृथ्वीतलावरील समस्त पदार्थ पंचातत्वापासूनच निर्मित आहे. पर्यावरण हा सुध्दा मनुष्याचा जीवनातील अविभाज्य घटक आहे.

महाकवी कालिदास यांच्या नाटकांत पर्यावरण व मानव प्रकृतीतील नैसर्गिक सजीव तसेच मनुष्याच्या जीवनातील मनोहरी दृश्य दिसून येते.

पर्यावरण शब्द" परी+ आ+वृ+ल्युट "पासून बनलेला आहे याचाच अर्थ असे वातावरण की जर मनुष्याला चारही बाजूने व्याप्त होऊन प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रुपाने जोडलेले आहे. प्रकृतीच्या शुध्दतेवरच पर्यावरणाची शुध्दता अवलंबून असते. पृथ्वी,आप, तेज,वायू,आकाश या पंचतत्वांना शुध्द ठेवणे हे मानवी जीवनाचे परम कर्तव्य आहे परंतु खरे म्हणजे मानवच मानवाच्या जीवनाचा शत्रू बनला आहे कारण कारखान्यातून व वाहनातून वाहणारा धूर मनुष्यच सोडतो आणि जे अन्न खाऊन मनुष्य जगतो त्या अन्ना बरोबर मनुष्य प्रतिदिन धुरही खातो जसजशी लोकसंख्या वाढू लागली तसतसे कारखाने व वाहनांची संख्या वाढली. त्यातूनच मनुष्याला घातक असलेला धूर याचेही प्रमाण वाढले आहे. याची कमी म्हणून की काय वृक्षतोडीचे प्रमाण वाढले यामुळेच पृथ्वीचे वायुमंडल दूषित होवून यावर छिद्र पडले आहे. यायाच परिणाम म्हणजे पृथ्वीचा आज ना उद्या अंत निश्चित आहे. मनुष्याचा व पृथ्वीचा अंत थांबविणे साठी "झाडे लावणे झाडे जगविणे" तसेच "पाणी अडविणे व पाणी जिरविणे अत्याधिक आवश्यक आहे. त्यासाठी पर्यावरण आणि लोकसंख्या यांच्यामध्ये संतुलन राखणे हे अत्यावश्यक आहे म्हणून प्राचीन काळापासूनच विशाल सस्कृत साहित्यामध्ये पर्यावरण संरक्षण संवर्धन यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे यासाठी महाकवी कालिदास यांच्या काव्यामध्ये संस्कृत साहित्यात अनेक उल्लेखनीय वेगवेगळे प्राचीन दाखले वाख्याण्याजोगी आहेत. स्वच्छ पर्यावरण कसे ठेवावे याचे फायदे तोटे कोणते? याची शिकवण अजुनही आपल्याला मिळत आहे संस्कृत साहित्यात वाख्याण्याजोगे उल्लेखनिय वेगवेगळे प्राचीन दाखले दिसून येतात त्यापैकी कालिदासांनी अभिज्ञान शाकुन्तलममध्ये पर्यावरणाची रमणीयता मोठ्या सुंदरतेने वर्णिलेली आहे हे या श्लोकातून दिसून येते.

रम्यांन्तर : कमलिनीहरितैः सरो भिश्छायादुमैर्नियमितार्कमयूखतापः।
भुयात्कुशेशयरम्रदुरेणुरस्याःशान्तानुकूलपवनश्चशिवश्चपन्थाः॥
अभिज्ञान शाकुन्तलम्. ४-१०

कमलीनीमुळे सरोवर हिरवे झाल्याने अतिशय रमणीय वाटत आहे. मार्गावरील सावलीमुळे अनियमित सूर्याची उष्णता आहे. मार्गावर सगळीकडे कमळाचे परागकण उडून पसरलेले आहेत अशाप्रकारे शांत अनुकूल वारा वाहत आहे यामुळे तुझा प्रवास सुखाचा जावो पण ते सुध्दा होते केवळ सुखद पर्यावरणामुळे म्हणून भरपूर वृक्ष आपणास सावली फळे फुले देतात याप्रमाणेच वातावरण शांत व आल्हाददायी असल्यावर आमच्या प्रवासही सुखकर होतो आणि ते साध्य होते केवळ आणि केवळ सुखद पर्यावरणामुळेच त्याचप्रमाणे पर्यावरणातील वायू जास्तीत जास्त प्रमाणात शुध्द करतात वृक्ष ऑक्सिजन निर्माण करुन कार्बन डाय-ऑक्साइड वायू

स्वत:मध्ये सामावून घेतात व आपल्याला शुध्द हवा देतात जी हवा आपल्या मनुष्यमात्रसाठी जीवन आहे म्हणजेच ते आपल्याला दुसरे तिसरे काही नसून मनुष्याचे जीवन म्हणजे प्राणच देतात मनुष्यास शुध्द हवा प्रसन्न आनंदित करते शिवाय उत्साह वाढवते.

पर्यावरणावर आधारित असेच एक उदाहरण द्यावयाचे झाले तर महाकवी कालिदासाने "कुमारसंभवम्"या महाकाव्याचा प्रारंभ हिमालयाच्या वर्णनापासून केला आहे.

पार्वती शिवाच्या प्राप्ति साठी तपस्या साठी गौरी शिखरावर पर्वतावर सर्वप्रथम रोपटे लावते व त्या रोपट्याचे प्रतिदिन संगोपन व संवर्धन करते यावरुन स्पष्ट होते की वृक्ष व ऑक्सीजन तसेच पर्यावरण व मनुष्य यांचा घनिष्ठ संबंध दिसून येतो मनुष्य व पर्यावरण हे एकदुसऱ्या शिवाय जगू शकत नाही.

याचप्रमाणे महाकवी कालिदास रघुवंशम मध्ये एका श्लोकात सांगतात. जलतरंगामुळे तलावातील पाण्यात शीतलता निर्माण झाली आहे मनोरम सुगंध श्वास घेता येतो आहे अशा सुगंध वातावरणाने मन प्रफुल्लित होत आहे आरोग्य सुदृढ राहते अशा वातावरणात कोणत्या मनुष्याला आनंद मिळणार नाही शुध्द पर्यावरणाचा परिणाम मानवावरच नाही तर पशुपक्ष्यांवर देखील होतो. रघुवंशममध्ये पशुपक्षांचे वर्णन करताना महाकवी कालिदास सांगतात आकाशात उडणारे पक्षांची एकच रांग मनोरम शब्द बोलणारे सारस पक्षांचा जणू काही फुलांच्या तोरणा प्रमाणे भासतो आहे की आकाशात  स्वच्छंदपणे पशु पक्षी विहार करीत असताना आज दूषित वायू मंडळामुळे पक्ष्यांचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे जिथे भरपूर प्रमाणात वृक्ष तेथेच पक्षी वास्तव्य करतात क्षणभर विसावा घेतात.

पुढे कवी मेघदुत खंडकाव्यात सांगतात.

पांढरा केवड्याच्या फुलांमुळे बागेचे कुंपण श्वेत रंगाचे दिसत आहे पक्षांनी वृक्षांवर घरटी बांधल्यामुळे पिंपळ,वड इत्यादी वृक्ष जणु गजबजून गेलेले आहेत. काळा रंग ज्यांच्यावर चढलेला आहे अशी पिकलेली जांभळाची फळे असलेल्या अरण्यात काही दिवस निवास करतील अशा प्रकारे विविध पक्ष्यांच्या कुंजना च्या सहवासासाठी भरपूर प्रमाणात वृक्षांच्या संख्येची गरज आहे. परंतु वेगाने वाढणारी वृक्षतोडीमुळे सध्यातरी असे चित्र आपल्याला कल्पनेतच बघता येईल वृक्षतोडीमुळे पृथ्वीवरील तापमान वाढत आहेत उष्णतेमुळे पदोपदी मानवाला थंडाव्याची गरज भासत आहे. या शीतलतेसाठी मानवाने स्वरक्षणासाठी काय काय आवश्यक आहे हे महाकवी कालिदास यांनी अभिज्ञानशकुन्तलम् मध्ये सांगितलेल्या श्लोकातून दिसून येते.

खरंच पर्यावरणाच्या समृध्दीने मनुष्याचे जीवन सुखकर होऊ नये म्हणून वृक्ष पर्यावरणातील एक अविभाज्य घटक आहे म्हणून वृक्ष लावणे व त्यास जिवापाड जपणे हे अधिक महत्तवाचे आहे.

अभिज्ञान शाकुन्तलम् मध्ये वृक्षावर शकुंतलेचे भावाप्रमाणे जिवापाड प्रेम आहे हे या दिसून येते मटका

यावरुन वृक्ष लागवडीचे व संगोपनाचे महत्त्व दिसून येते कारण वृक्ष स्वतः उन्हाचा ताप सहन करुन पथिकांना सावली देतात. अशा प्रकारे मनुष्य पर्यावरणाचे नाते घनिष्ठ आहे हे नाते संपविणे म्हणजे मनुष्याने स्वत:ला संपविणे होईल.

## सारांश:

दूषित पर्यावरणामुळे मानवी जीवनावर त्याचे दुष्परिणाम दिसून येत आहे. पृथ्वीवर तापमान वाढल्यामुळे एशीसारख्या वस्तूवर मनुष्याला अवलंबून राहावे लागत आहे वृक्षतोडीमुळे पशुपक्ष्यांचा आसरा मिळत नाही. ऑक्सीजन वायूचे प्रमाण कमी व प्रदूषित वायूचे प्रामण जास्त असे सध्याचे चित्र वृक्षतोडीमुळे दिसून येत आहे तसेच वृक्षतोडीमुळे पावसाचे प्रमाणही कमी होताना दिसत आहे परंतु शुध्द हवेसाठी वृक्षांची लागवड करण्याची अत्याधिक गरज आहे. वृक्ष तोड फारच आवश्यक असेल तेव्हाच केली जावी शुध्द हवा व पृथ्वीचा समतोल राखण्यासाठी वृक्षलागवड करुन संगोपण व संवर्धन करणे आवश्यक आहे त्याचप्रामणे लोकसंख्याही नियंत्रणात आणणे गरजेचे आहे लोकसंख्येच्या वाढत्या प्रमाणामुळेच पशुपक्ष्यांच्या निवासावर कुऱ्हाड टाकली जाते. मनुष्य पशूपक्ष्यांच्या हक्काच्या वास्त्व्याच्या ठिकाणी शिरत आहे त्यामुळे मोठ्या प्रामणात वृक्षतोड होत आहे. माणसाच्या अन्न वस्त्र निवारा गरजांपैकी या पैकी मनुष्य निवारा हा पशुपक्ष्यांच्या ठिकाणावर घेत आहे असे होऊ नये यासाठी पर्यावरणाविषयी जागृती निर्माण करणे आवश्यक आहे.

## संदर्भ ग्रंथ

१) अभिज्ञान शाकुन्तलम्,कुमारसंभवम्, मेघदूतम्, रघुवंश.
२) मेघदूत - कालिदास
३) संस्कृत साहित्य का आलोचनात्मक इतिहास - रामजी उपाध्याय.
४) संस्कृत साहित्याचा सोपत्तीक इतिहास -  विनायक वामन करंबेळकर